दैनिक
बीड महाराष्ट्र | रविवार , 6 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 117 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN NO. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

# आष्टी तालुक्यातील पश्चिम भागात दुष्काळाचं सावट अधिक गडद!

## उभ्या पिकात जनावरे सोडण्याची वेळ, स्वतंत्र पॅकेज जाहीर करण्याची मागणी

■ देऊळगाव घाट (आदिनाथ ठोंबरे )

सध्या राज्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. कारण शेतकऱ्यांची उभी पिकं पाण्यावाचून करपू लागली आहेत. पावसाळा सुरु होऊन तीन महिन्याचा कालावधी लोटला तरीदेखील चांगला पाऊस पडला नाही. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. अशीच परिस्थिती बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात देखील आहे. पाऊस नसल्यामुळं उभ्या पिकात जनावरे सोडण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. दुष्काळाचे सावट गडद होताना दिसत आहे. या अस्मानी संकटाचा आमचे प्रतिनिधी आदिनाथ ठोंबरे यांनी घेतलेला आढावा...



### दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी हतबल, चाऱ्याची तीव्र टंचाई

■ बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील घाटदेऊळगाव, दौलावडगाव सावरगाव, शेडाळा परीसरात दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी हतबल झाले आहे. चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. या भागातील काही शेतकऱ्यांनी उभ्या पिकातच जनावरे सोडल्याचे चित्र आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे. उभी पिके वाया गेल्याने आणि जनावरांसाठी चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने काही शेतकऱ्यांनी उभ्या पिकातच आपली जनावरे सोडली आहेत. यावेळी एका हताश शेतकऱ्याकडून जनावरांना चारा आणि पाणी कसे द्यायचे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. पाऊस नाही पाणी नाही, हाता- तोंडाशी आलेला घास हिरावला आहे. गेल्या दोन तीन महिन्यांपासून या भागात पावसाने दडी मारल्यामुळे परिसरात अत्यंत भीषण पाणीटंचाई आणि दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. भर पावसाळ्यात दिवसभर कडक उन, अन् रात्री टिपुर चांदणं, पावसाअभावी शेतातील उभी पिके करपून गेल्याने शेतकरी वर्ग मोठ्या संकटात सापडला आहे. तालुक्यातील सोयाबीन, बाजरी, कपाशी, तूर, मूग, उडीद ही मुख्य पिके पाण्याअभावी पूर्णपणे धोक्यात आली आहेत. हाता- तोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. प्रशासनाने या गंभीर परिस्थितीची तात्काळ दखल घेऊन पंचनामे करावेत आणि मदत जाहीर करावी. तालुक्यातील ही बिकट परिस्थिती पाहता, राज्य सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत आणि जनावरांसाठी छावण्यांची सोय करावी, अशी मागणी जोर धरत आहे. जोर धरत आहे.

### "पावसाचे सर्व अंदाज फेल"

■ विविध माध्यमांतून कोणत्याही शास्त्रीय आधाराशिवाय हवामान अंदाज सांगणाऱ्या खाजगी व्यक्तींचे पेव फुटले असून, या अंदाजांच्या आधारावर शेतकरी खते व बियाणे खरेदी करून पेरणी करतात, मात्र सर्व अंदाज फेल ठरत आहेत. यावर विश्वास ठेवल्याने व पाऊस न पडल्याने बळीराजाचे मोठे आर्थिक नुकसान झाले .चुकीचे व अनधिकृत हवामान अंदाज सांगून बळीराजाची दिशाभूल होत आहे. यामुळे बळीराजा मनातून खचत चालला आहे. या अंदाजावर बंदी घालावी असाही सूर ऐकायला मिळत आहे

### पीक पाहणी ॲपमधील त्रुटींमुळे शेतकरी त्रस्त

■ सुधारित 'ई-पीक पाहणी' ॲपमधील विविध तांत्रिक त्रुटींमुळे शेतकऱ्यांना पिकांची नोंदणी करताना मोठ्या अडचणी येत आहेत. यंदा स्वनोंदणीचा पर्याय काढून गावात साहाय्यक नेमल्याने नोंदणीचे काम अतिशय संथ गतीने सुरू आहे. ॲपमधून गट व सर्व्हे नंबर गायब होणे आणि लोकेशनमधील तफावतीमुळे फोटो अपलोड करणे अशक्य झाले आहे. ७/१२ उताऱ्यापेक्षा कमी क्षेत्र दर्शवले जात असल्याने पीकविमा आणि नैसर्गिक आपत्तीच्या नुकसानभरपाईला मुकण्याची भीती निर्माण झाली आहे. प्रशासनाने या तांत्रिक त्रुटी दूर करून शेतकऱ्यांसाठी पुन्हा स्वनोंदणीचा पर्याय उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी सोशल मिडियातून व्यक्त होत आहे.

### पिकविम्यासह स्वतंत्र पॅकेज जाहीर करा

■ या संकटाने शेतकरी हवालदिल झाला आहे. पेरणीसाठी हजारो रुपये खर्च झाले आहेत. मायबाप सरकार 17 सप्टेंबर, मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत मराठवाड्यात दुष्काळ जाहीर करून स्वतंत्र दुष्काळी पॅकेज जाहीर करेल या अपेक्षेत शेतकरी आहे.

## गोविंदा दुर्घटना अपडेट: केईएम रुग्णालयात सर्वाधिक जखमी; मुंबईतील रुग्णालयांची आकडेवारी समोर

■ मुंबई : वृत्तसंस्था

दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने शनिवारी मुंबईत सर्वत्र उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. 'गोविंदा रे गोपाळा' आणि 'बोल बजरंग बली की जय'च्या जयघोषात विविध गोविंदा पथकांनी उंच हंडी फोडण्यासाठी मानवी मनोरे रचले. ढोल-ताशांच्या गजरात आणि गाण्यांवर थिरकत गोविंदांनी थरावर थर लावत हंडी फोडण्याचा प्रयत्न केला. मात्र, काही ठिकाणी मनोरे कोसळल्याने अनेक गोविंदा जखमी झाले.

शनिवारी सकाळपासूनच मुंबईच्या विविध भागांमध्ये दहीहंडी उत्सवासाठी गोविंदा पथके रवाना झाली होती. अनेक ठिकाणी राजकीय पक्ष आणि स्थानिक मंडळांकडून दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. हंडी फोडण्यासाठी गोविंदांनी उंच मानवी मनोरे उभारले. काही पथकांनी हंडी फोडण्यात यश मिळवले, तर काहींनी केवळ सलामी देत सहभाग नोंदवला. मात्र, थर रचताना तोल गेल्याने काही मनोरे कोसळले आणि गोविंदांना दुखापत झाली. त्यामुळे उत्सवाच्या आनंदासोबतच जखमी गोविंदांच्या उपचारासाठी रुग्णालयांमध्येही दिवसभर गर्दी पाहायला मिळाली.



## मुंबईत मध्यरात्री दोन ठिकाणी आगीच्या घटना ; धारावीत गॅस सिलिंडरच्या भडक्यात दोन मुलांसह चार जण जखमी

■ मुंबई : वृत्तसंस्था

मुंबईत मध्यरात्री दोन वेगवेगळ्या ठिकाणी आगीच्या घटना घडल्यामुळे खळबळ उडाली आहे. धारावीतील (Dharavi Fire) राजीव गांधी नगर परिसरात एका घरात गॅस सिलिंडरचा भीषण भडका उडाल्याने चार जण गंभीर जखमी झाले, तर ग्रँट रोड येथील लॅमिंग्टन रोडवर एका दुकानात आग लागल्याची घटना घडली.

घरात गॅस गळतीमुळे अचानक आग लागली

धारावीतील सायन-धारावी लिंक रोडवरील एका तीन मजली घरात मध्यरात्री गॅस गळतीमुळे अचानक आगीचा भडका उडाला. अग्निशमन दल पोहोचण्यापूर्वीच स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान दाखवत आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील आणि परिसरातील चार जण भाजले गेले. जखमींमध्ये पूनम जयस्वाल (30 वर्षे), रोहन गुप्ता (5 वर्षे), रुद्र गुप्ता (4 वर्षे) आणि पार्वती गांधारी (19 वर्षे) यांचा समावेश आहे. सर्व जखमींवर सायन रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. घटनास्थळी पोलीस, अग्निशमन दल आणि बेस्टच्या कर्मचाऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली.

### मोबाईलच्या दुकानात आग

दुसऱ्या घटनेत मुंबईतील ग्रँट रोड परिसरातील प्रसिद्ध लॅमिंग्टन रोडवर रात्री 11.30 वाजेच्या सुमारास एका मोबाईलच्या दुकानाला आग लागली. सरस्वती भवन येथील एका गाळ्यात ही आग लागली होती, जे गोडाऊन म्हणून वापरले जात होते. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. दोन्ही घटनांमध्ये आगीचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## पत्रकारीतेसह सामाजिक कार्याची दखल घेऊन चंद्रकांत कातळे यांचा शिवरत्न पुरस्काराने गौरव

■ लातूर प्रतिनिधी

लोकनेते स्वर्गीय विलासरावजी देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त रेणापूर येथील ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत कातळे यांच्या पत्रकारितेसह सामाजिक कार्याची दखल घेऊन लातूर मिशन व शिवदर्शन फाउंडेशन लातूरच्या वतीने शिवरत्न पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी लातूर मिशन वृत्तपत्र आणि शिवदर्शन फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिवरत्न पुरस्कार वितरण सोहळा नुकताच पंढरपूर येथील भागवताचार्य हभप श्री त्र्यंबक महाराज आंबुलगेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमास लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे, काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते हनुमंत पवार, महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष संतोष नागरगोजे, जिप गटनेत्या आशाताई भिसे, क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष अँड परीक्षित पवार, विभागीय माहिती उपसंचालक सुनील कच्छवे संपादक अशोक हनवते यांची प्रमुख उपस्थित होती.

1987 पासून पत्रकार म्हणून जिद्दीने आणि चिकाटीने पत्रकारिता क्षेत्रात कार्य करणारे चंद्रकांत कातळे यांनी रेणापूर तालुका पत्रकार संघाची स्थापना करून तालुका स्तरावरील पहिले पत्रकार भवन उभा करणे, पत्रकाराच्या अडीअडचणी सोडवून त्यांना न्याय देणे, मध्य रेल्वेच्या सल्लागार समिती, जिल्हास्तरीय दक्षता समिती, तालुका संजय गांधी निराधार योजना समिती यासह विविध समितीवर केलेल्या उत्कृष्ट कार्याची त्याचबरोबर सामाजिक, अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्याची दखल घेऊन त्यांना शिवरत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील दहा कर्तबगार व्यक्तींना शिवरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी पुरस्कार प्राप्त सर्वांच्या कार्याचे कौतुक करून मौलिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची प्रास्ताविक भारत जाधव यांनी केले तर शेवटी गणेश स्वामी यांनी आभार व्यक्त केले.

# महामुकाबल्याचा काउंटडाऊन! महिला आशिया कपमध्ये भारत-पाकिस्तान भिडणार

■ दुबई : वृत्तसंस्था

महिला आशिया कप २०२६ स्पर्धेत आधीच उपांत्य फेरीत धडक मारल्यानंतर भारतीय महिला संघ आता आपल्या साखळी फेरीतील अंतिम सामन्यासाठी सज्ज झाला आहे. या सामन्यात भारताची गाठ पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी पडणार आहे. शनिवारी, ५ सप्टेंबर रोजी रंगणाऱ्या या हाय-व्होल्टेज सामन्याकडे जगभरातील क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे. चालू स्पर्धेतील सलग विजय आणि तगडी गोलंदाजी-फलंदाजी पाहता भारतीय संघ या सामन्यात विजयाचा प्रबळ दावेदार मानला जात आहे, तर दुसरीकडे पाकिस्तानसमोर भारताला रोखण्याचे मोठे आव्हान असणार आहे.



## स्मृती-शेफालीचा धडाका अन् भारताची तगडी फलंदाजी

■ भारतीय संघाची सर्वात मोठी ताकद ठरतेय ती म्हणजे सलामीवीर स्मृती मानधना (Smruti Mandhana) आणि शेफाली वर्मा (Shefali Varma) यांचा तुफानी फॉर्म. हाँगकाँगविरुद्धच्या सामन्यात मानधनाने केलेल्या विक्रमी शतकाने प्रतिस्पर्धी संघांच्या गोटात धडकी भरवली आहे. या सलामीच्या जोडीकडून पुन्हा एकदा आक्रमक सुरुवातीची अपेक्षा असेल. याशिवाय कर्णधार हरमनप्रीत कौर, रिचा घोष आणि प्रतिका रावल यांच्यावर मधल्या फळीत संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत पोहोचवण्याची किंवा मिळालेल्या सुरुवातीचे मोठ्या खेळीत रूपांतर करण्याची जबाबदारी असेल.

## पाकिस्तानच्या फलंदाजीची डोकेदुखी ; भारतासमोर कसोटी

■ दुसऱ्या बाजूला पाकिस्तान संघाची फलंदाजी ही त्यांची सर्वात कमजोर कडी ठरत आहे. थायलंडविरुद्धच्या सामन्यात पॉवरप्लेमध्येच ३ विकेट्स गमावल्यामुळे पाकिस्तानची अवस्था बिकट झाली होती. तो सामना त्यांनी ११९ धावांचा बचाव करत जिंकला असला, तरी भारताच्या भक्कम गोलंदाजीसमोर पाकिस्तानच्या फलंदाजांची खरी कसोटी लागणार आहे. पाकिस्तानला विजयाची आशा जिवंत ठेवायची असेल तर त्यांच्या फलंदाजांना अत्यंत शिस्तबद्ध आणि आक्रमक खेळ करावा लागेल.

## भारत वि. पाकिस्तान सामन्याची A टू Z माहिती

- सामन्याची तारीख व वेळ: हा थरारक सामना शनिवार, ५ सप्टेंबर २०२६ रोजी भारतीय वेळेनुसार रात्री ८:०० वाजता सुरू होईल.
- सामन्याचे ठिकाण: हा सामना दुबईतील प्रसिद्ध 'दुबई इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियम'वर खेळवला जाणार आहे.
- टीव्हीवर थेट प्रक्षेपण: टीव्हीवर या सामन्याचा थेट आनंद घेण्यासाठी चाहत्यांना 'सोनी स्पोर्ट्स नेटवर्क'च्या विविध वाहिन्यांवर थेट प्रक्षेपण पाहायला मिळेल.
- मोबाईलवर स्ट्रीमिंग: डिजिटल प्लॅटफॉर्मवर सामना पाहणाऱ्या चाहत्यांसाठी ॲप आणि त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर सामन्याचे लाईव्ह स्ट्रीमिंग उपलब्ध असणार आहे.

# रोहित शर्माच्या टीम इंडियातील स्थानाला धोका नाही

■ मुंबई : प्रतिनिधी

भारताचा दिग्गज फलंदाज रोहित शर्माला वनडे संघात स्थान देण्याबाबत काही दिवसांपासून प्रश्न उपस्थित होत आहेत. रोहित 2027 च्या विश्वचषकात खेळताना चाहत्यांना पाहता येणार नाही. मात्र, आता या अफवांना पूर्णविराम मिळाला आहे.

रोहित शर्माच्या बाबतीत सद्यस्थिती कायम आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) स्पष्ट केले आहे की, या माजी कर्णधाराच्या टीम इंडियातील स्थानाला कोणताही तात्काळ धोका नाही. विशेषतः २०२७ च्या विश्वचषकातील सहभागाबाबत मोठ्या प्रमाणावर तर्कवितर्क लावले जात आहेत. बैठकीनंतर रोहित शर्माच्या भविष्याबद्दल माहिती देताना बीसीसीआयचे सचिव



देवजित सैकिया म्हणाले की, "रोहित शर्मा प्रत्येक सामन्यात उत्कृष्ट खेळत आहे. यापेक्षा अधिक काय हवे? रोहितने मागच्या सामन्यात १३८ धावा देखील केल्या होत्या. मग अशा अफवा का पसरवल्या जात आहेत?." या बैठकीला भारताचे दोन कर्णधार म्हणजेच शुभमन गिल (कसोटी आणि एकदिवसीय सामने) आणि श्रेयस अय्यर (टी-२० सामने) उपस्थित होते.

मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि 'सेंटर ऑफ एक्सलन्स'चे (सीओई) प्रमुख व्ही.व्ही.एस. लक्ष्मण हे देखील यावेळी उपस्थित होते. मात्र, निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवली. ते मुंबईबाहेर होते त्यामुळे ते या बैठकीला हजर राहू शकले नाहीत. बीसीसीआयच्या सचिवांनी लक्ष्मण यांचा 'क्रिकेट संचालक' अशा नवीन भूमिकेसाठी विचार केला जात असल्याच्या चर्चाही फेटाळून लावल्या. तसेच, आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीमध्ये कोणताही तात्काळ बदल केला जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# भारत-जपान पहिल्यांदाच क्रिकेटच्या मैदानावर ; २२ सप्टेंबरला ऐतिहासिक टी-२० सामना

■ नवी दिल्ली वृत्तसंस्था

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) शुक्रवार, ४ सप्टेंबर रोजी एक मोठी घोषणा केली.बीसीसीआयच्या म्हणण्यानुसार, आशियाई क्रीडा स्पर्धेतील आपल्या मोहिमेला सुरुवात करण्यापूर्वी, भारतीय पुरुष क्रिकेट संघ जपानविरुद्ध एक ऐतिहासिक टी-२० सामना खेळणार आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारताचा पहिला सामना २८ सप्टेंबर रोजी होणार असून, जपानविरुद्धचा हा सामना त्यापूर्वी अवघ्या सहा दिवसांनी, म्हणजेच २२ सप्टेंबर रोजी खेळला जाईल. पुरुष क्रिकेटच्या इतिहासात भारतीय आणि जपानी संघ आमनेसामने येण्याची ही पहिलीच वेळ असेल.



बीसीसीआयने आपल्या अधिकृत ट्विटर हँडलवर जाहीर केले आहे की, भारत आणि जपान यांच्यातील संबंधांच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त या ऐतिहासिक टी२० सामन्याचे आयोजन करण्यात आले आहे. मंडळाने शेअर केलेल्या फोटोनुसार, हा सामना मंगळवार, २२ सप्टेंबर रोजी जपानमधील तोचिगी प्रांतातील सानो आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर खेळला जाईल. सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी ९:३० वाजता सुरू होईल.

भारत आणि जपान आपल्या राजनैतिक संबंधांची ७५ वर्षे साजरी करत आहेत. हा विशेष प्रसंग साजरा करण्यासाठी, दोन्ही देशांचे पुरुष क्रिकेट संघ २२ सप्टेंबर २०२६ रोजी जपानमधील तोचिगी येथे एक ऐतिहासिक टी२० आंतरराष्ट्रीय सामना खेळतील. हा सामना 'स्पोर्ट ७५' नावाच्या एका नवीन उपक्रमाचा भाग आहे, जो जपानच्या पंतप्रधान सनाए ताकाइची आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीदरम्यान ठरवण्यात आला होता. खेळाच्या माध्यमातून दोन्ही देशांमधील संबंध आणि मैत्री अधिक दृढ करणे, हे याचे मुख्य उद्दिष्ट आहे. याशिवाय, २०३६ मध्ये ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक खेळांचे आयोजन करण्याच्या भारताच्या स्वप्नाला पाठिंबा देण्यासाठी हा उपक्रम तयार करण्यात आला आहे, जेणेकरून दोन्ही देश क्रीडा क्षेत्रात एकमेकांना सहकार्य करू शकतील.

बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया म्हणाले की, हा टी-२० सामना खेळण्यासाठी जपानला जाणे ही भारतीय क्रिकेट संघासाठी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. त्यांनी सांगितले की, जपान आणि उर्वरित पूर्व आशियामध्ये क्रिकेटला लोकप्रिय करण्यासाठी हा सामना एक उत्तम संधी आहे. भारत आणि जपान यांच्यातील मैत्री खूप जुनी आणि घट्ट आहे, आणि खेळाच्या माध्यमातून या ७५ वर्षांच्या संबंधांचा उत्सव साजरा करणे हा एक खरोखरच विशेष अनुभव असेल. आशियाई खेळांपूर्वी, भारतीय संघ अफगाणिस्तानविरुद्ध तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे.

# रोहित शर्माला बीसीसीआय कडून मोठा संकेत; पण आगरकरच्या भवितव्यावर सैकियांनी स्पष्ट केलं!

**मुंबई :** भारतीय क्रिकेटमधील सध्याच्या घडामोडींमध्ये रोहित शर्मा आणि मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांच्या भवितव्याबाबत सुरू असलेल्या चर्चांना BCCI सचिव देवजित सैकिया यांनी काही प्रमाणात पूर्णविराम दिला आहे. गुरुवारी, ३ सप्टेंबर रोजी मुंबईत BCCIची महत्त्वाची Review Meeting पार पडली. या बैठकीत भारतीय संघाची अलीकडील कामगिरी, खेळाडूंच्या दुखापती, आगामी मालिका आणि २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाची तयारी यावर चर्चा करण्यात आली.

या बैठकीला मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर, Test आणि ODI कर्णधार शुभमन गिल, T20I कर्णधार श्रेयस अय्यर, VVS लक्ष्मण आणि BCCI सचिव देवजित सैकिया उपस्थित होते. मात्र मुख्य निवडकर्ता अजित आगरकर बैठकीला उपस्थित नव्हते. बैठक अल्प सूचनेवर बोलावण्यात आली होती आणि आगरकर शहराबाहेर असल्याने ते प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत. ज्या ठिकाणी ते होते, तिथे इंटरनेट कनेक्टिव्हिटी उपलब्ध नसल्याने ते ऑनलाइनही सहभागी होऊ शकले नाहीत, अशी माहिती सैकिया यांनी दिली.

आगरकर बैठकीला नसल्याने त्यांच्या Chief Selector पदाच्या भवितव्याबाबत चर्चांना उधाण आले होते. मात्र सैकिया यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, या बैठकीत निवड समिती किंवा अजित आगरकर यांच्या कार्यकाळाबाबत कोणतीही चर्चा झालेली नाही. त्यामुळे आगरकर यांची हकालपट्टी किंवा त्यांचा कार्यकाळ संपवण्याचा कोणताही निर्णय झालेला नाही. दरम्यान, रोहित शर्माच्या भवितव्याबाबत सैकिया यांची प्रतिक्रिया चर्चेत आली. रोहित सध्या चांगला खेळत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे 2027 एकदिवसीय विश्वचषकच्या पार्श्वभूमीवर रोहितसाठी हा सकारात्मक संकेत मानला जात आहे. मात्र BCCIने रोहितचे विश्वचषकामधील स्थान अद्याप अधिकृतपणे निश्चित केलेले नाही. बैठकीत पुढील SENA दौऱ्यांसाठी खेळाडूंना पुरेसा आराम, acclimatisation आणि गरजेनुसार सराव सामने देण्याच्या रणनीतीवरही चर्चा झाली. तसेच पुढील वर्षी होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकासाठी सर्वोत्तम टीम कॉम्बिनेशन तयार करण्यावर BCCIचा भर राहणार आहे.

# आशियाई खेळांसाठी दुखापतग्रस्त नीरज चोप्राच्या जागी यशवीर सिंगला संधी

■ नवी दिल्ली : प्रतिनिधी

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेता भालाफेकपटू यशवीर सिंगचा, दुखापतग्रस्त नीरज चोप्राच्या जागी जपानमध्ये होणाऱ्या आशियाई खेळांसाठीच्या भारतीय ॲथलेटिक्स संघात समावेश करण्यात आला आहे. लांब पल्ल्याचा धावपटू अभिषेक पाल याला कथित उत्तेजक द्रव्य सेवनाच्या उल्लंघनाबद्दल नाडा (NADA) कडून नोटीस बजावण्यात आल्यानंतर संघातून वगळण्यात आले आहे. भारतीय ॲथलेटिक्स महासंघाने (AFI) लुधियाना येथे एका पत्रकार परिषदेत, १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या ऐची-नागोया आशियाई खेळांसाठी ७७ सदस्यीय भारतीय ॲथलेटिक्स संघाची घोषणा केली. राष्ट्रीय युवा चॅम्पियनशिप स्पर्धा देखील लुधियाना येथे आयोजित करण्यात येत आहेत. पुरुष ११० मीटर अडथळा शर्यतीचा धावपटू तेजस शिरसे यालाही ग्लासगो येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रकुल खेळांदरम्यान झालेल्या दुखापतीमुळे संघातून वगळण्यात आले आहे.एएफआयचे अध्यक्ष बहादूर सिंग सग्गू म्हणाले की, सध्या दुखापतग्रस्त असलेल्या नीरज चोप्राच्या जागी आम्ही राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदक विजेता यशवीरचा समावेश केला आहे. हा बदल दुखापतीमुळे झाला आहे, त्यामुळे यशवीरच्या समावेशात कोणतीही अडचण नव्हती. ते पुढे म्हणाले की , धावपटू अभिषेक पालला त्याच्या समस्यांमुळे संघातून वगळण्यात आले आहे.

## पुरुषांची भालाफेक टीम

■ जपानमधील आयची-नागोया येथे होणाऱ्या आशियाई खेळांमध्ये पुरुषांच्या भालाफेक प्रकारात यशवीर सिंग आणि रोहित यादव हे दोन खेळाडू भारताचे आव्हान सादर करतील. नीरज चोप्राचा इतिहास नीरज चोप्राने २०१८ (जकार्ता) आणि २०२३ (हांगझोऊ) आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. यंदा दुखापतीमुळे त्याला आपले जेतेपद राखण्यासाठी मैदानात उतरता येणार नाही.




त्यामुळे, आशियाई खेळांसाठी हा अंतिम संघ आहे. का मिळाली संधी? यशवीर सिंगने नुकत्याच झालेल्या ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ८५.४१ मीटरचा सर्वोत्तम थ्रो करत कांस्य पदक जिंकले होते.

# किदाम्बी श्रीकांतची आगेकूच कायम, तन्वी शर्माचे आव्हान संपुष्टात

■ शेन्झेन (चीन) : वृत्तसंस्था

किदाम्बी श्रीकांतने जागतिक क्रमवारीत नवव्या क्रमांकावर असलेल्या व्हिक्टर लाईला पराभूत करत चायना मास्टर्स सुपर 750 बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. श्रीकांतने कॅनेडियन बॅडमिंटनपटूला 21-18, 21-19 अशा सरळ गेममध्ये पराभूत केले. यावर्षी यूएस ओपन सुपर 300 च्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या श्रीकांतने, गेल्या महिन्यात नवी दिल्लीत आपले दुसरे विश्व चॅम्पियनशिप कांस्यपदक जिंकलेल्या लाईला पराभूत करण्यासाठी शानदार कामगिरी केली. माजी जागतिक क्रमवारीत अव्वल आणि 2021 विश्व चॅम्पियनशिप रौप्यपदक विजेता श्रीकांत आता हाँगकाँगच्या ली चेउक यूचा सामना करेल.



श्रीकांतने लाईविरुद्ध आपला झुंजारपणा दाखवला. पहिल्या गेममध्ये तो सुरुवातीला 3-7 ने मागे पडला, पण लाईच्या चुकांचा फायदा घेत त्याने स्कोअर 8-8 असा बरोबरीत आणला. मात्र, कॅनेडियन बॅडमिंटनपटूने मध्यांतरापर्यंत दोन गुणांची आघाडी घेतली. त्यानंतर त्याने स्कोअर 15-11 असा केला. मात्र, श्रीकांतने जोरदार पुनरागमन करत स्कोअर १५-१५ असा बरोबरीत आणला. आणखी एका क्रॉस-कोर्ट स्मॅशने या भारतीय खेळाडूला १८-१६ अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर त्याने तीन गेम पॉईंट्स मिळवले आणि दुसऱ्या गेम पॉईंटवर गेम जिंकला.

दुसऱ्या गेमच्या सुरुवातीला श्रीकांतकडून चुका झाल्या, ज्यामुळे तो ५-९ ने मागे पडला. मात्र, या भारतीय खेळाडूने पुनरागमन करण्याचे आपले प्रयत्न सुरूच ठेवले. तो ९-१४ ने जेव्हा मागे होता, तेव्हा त्याने दोन जोरदार फटके मारले आणि लाईच्या चुकांचा फायदा घेत स्कोअर १३-१४ असा बरोबरीत आणला. त्यानंतर स्कोअर १८-१८ असा बरोबरीत आला. त्यानंतर लाईचा फटका बाहेर गेला आणि श्रीकांतने एक जोरदार फटका मारून मॅच पॉईंट मिळवला आणि सामना आपल्या नावावर केला.

महिला एकेरीमध्ये तैपेई ओपन वर्ल्ड टूर सुपर ३०० चे विजेतेपद पटकावणारी तन्वी शर्मा, दुसऱ्या फेरीत जपानच्या जागतिक क्रमवारीत नवव्या क्रमांकावर असलेल्या तोमोका मियाझाकीकडून १७-२१, २१-१८, १६-२१ ने पराभूत झाली. मिश्र दुहेरीमध्ये चायनीज तैपेईच्या लिऊ कुआंग हेंग आणि ह्सू यिन हुई यांच्याकडून १८-२१, १८-२१ ने पराभूत झाल्यामुळे भारताचे ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो हे देखील स्पर्धेतून बाहेर पडले.

# संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांच्या 650 व्या जयंतीनिमित्त ऐतिहासिक चांभारगडास पर्यटन क दर्जा द्या ; गडाचे विकास काम सुरु करा


## मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी - समाजवादी पार्टी चर्मकार सभेचे प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजी कांबळे यांची माहिती



**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांच्या ६५० व्या जयंतीनिमित्त मौजे चांभारखिंड येथील ऐतिहासिक चांभारगडास पर्यटन क दर्जा द्या देवून तात्काळ गडाचे विकास काम सुरू करावे अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत समाजवादी पार्टी चर्मकार सभेच्या वतीने मंगळवार, दिनांक १ सप्टेंबर रोजी देण्यात आले आहे अशी माहिती प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजी कांबळे यांनी दिली आहे.

समाजवादी पार्टी चर्मकार सभेच्या वतीने मंगळवार, दिनांक १ सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनात प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजी कांबळे यांनी नमूद केले आहे की, मौजे चांभारखिंड, ता.महाड (जि. रायगड) येथील ऐतिहासिक चांभारगडावर दि.२० फेब्रुवारी २०२७ रोजी संत



समाजवादी पार्टी चर्मकार सभा
समाजवादी पार्टी
ॲड. शिवाजी देवाजी कांबळे प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य
प्रशासकीय कार्यालय : ठाकरसी हाऊस, 2 रा माळा, जे. एन. हेरादिया रोड, बेलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई - 400 001.
दूरध्वनी :+91-266 85 63 222| E-mail: samajwadipartypradeshoffice@gmail.com

दिनांक: 1 सप्टेंबर 2026

प्रति,
1. मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
मार्फत : मा. उपजिल्हाधिकारी साहेब, कार्यालय अंबाजोगाई, जिल्हा बीड.
विषय : दि. 20 फेब्रुवारी 2027 रोजी संत शिरोमणी गुरु रविदास महाराज 650 वी जयंती निमित्त मौजे चांभारखिंड येथील ऐतिहासिक चांभारगडास पर्यटन 'क' दर्जा देऊन त्यापूर्वी गडाचे विकास काम चालू करणे बाबत.

महोदय,
उपरोक्त विषयास अनुसरून विनंती करण्यात येते की, मौजे चांभारखिंड, ता. महाड, जि. रायगड येथील ऐतिहासिक चांभारगडावर दि. 20 फेब्रुवारी 2027 रोजी संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची 650 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. या पवित्र स्थळाचा ऐतिहासिक व धार्मिक वारसा जतन करण्यासाठी खालील मागण्या तात्काळ मंजूर करण्यात याव्यात.
आमच्या प्रमुख मागण्या :
1. चांभारगडास पर्यटन 'क' वर्ग दर्जा तात्काळ जाहीर करावा.
2. गडावरील पायऱ्यांच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामास (ज्याचे इस्टिमेट जि.प. अलिबाग कडे प्रलंबित आहे) तात्काळ प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी द्यावी.
3. गडावर संत गुरु रविदास महाराज यांचे भव्य स्मारक व चांभार समाजाच्या शहिदांचे स्मारक / शौर्य स्तंभ उभारण्यात यावा.
4. महाड बस स्थानकाजवळील रतनजी चांभार गडकरी यांच्या समाधीचे जतन, संवर्धन व पक्के बांधकाम करावे.
5. महाड बस स्थानकासमोर 'चांभारगड मार्ग' असा मोठा दिशादर्शक फलक लावावा.
6. मौजे चांभारखिंड गावात व गडाच्या पायथ्याला 'ऐतिहासिक चांभारगड' असा मोठा स्वागत फलक लावावा.
7. जयंती दिवशी ग्रामपंचायत मौजे चांभारखिंड यांनी हजर राहून भाविकांना मार्गदर्शन व गडाचे ऐतिहासिक महत्त्व सांगावे.
8. महाड येथील चर्मकार समाजाचे संत गुरु रविदास तरुण मंडळ, संत गुरु रविदास महिला मंडळ, संत गुरु रविदास चांभारगड संवर्धन समिती तसेच चर्मकार समाजाचे व या गडासाठी सातत्याने प्रयत्न करणारे स्थानिक कार्यकर्ते यांना या नियोजन समितीमध्ये समाविष्ट करून गडाचा सर्वांगीण विकास करण्यात यावा.
तरी उपरोक्त मागण्यांसाठी संबंधितांकडून तात्काळ अहवाल मागवून कार्यवाही करावी. अन्यथा आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास दि. 1 जानेवारी 2027 पासून आझाद मैदान, मुंबई येथे लोकशाही मार्गाने बेमुदत उपोषण / आंदोलन करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

निवेदक,
ॲड. शिवाजी कांबळे
चर्मकार सेल, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष
मो. ९४२००१५७७०, 8788638882

लिपीक
प्रतिलिपी :
2. मा. श्री. भरतशेठ गोगावले साहेब, पालकमंत्री, रायगड जिल्हा
3. मा. श्री. शंभूराजे देसाई साहेब, पर्यटन मंत्री, मंत्रालय, मुंबई
4. मा. सौ. पंकजाताई मुंडे साहेब, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री, मंत्रालय, मुंबई
5. मा. श्री. अबू असीम आझमी साहेब, आमदार, महाराष्ट्र विधानसभा
6. मा. जिल्हाधिकारी साहेब, रायगड
7. मा. पोलीस अधीक्षक साहेब, रायगड
8. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब, जि.प. अलिबाग

निवास : पंचफुला निवास, राजीव गांधी चौक, वडारवाडा, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड, महाराष्ट्र - 431517
संपर्क : +91 942 00 15 770/878 8638882|Email:shivajik743@gmail.com

शिरोमणी गुरू रविदास महाराज यांची ६५० वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. या पवित्र स्थळाचा ऐतिहासिक व धार्मिक वारसा जतन करण्यासाठी पुढील मागण्यां तात्काळ मंजूर करण्यात याव्यात. प्रमुख मागण्यां अशा, १) चांभारगडास पर्यटन क वर्ग दर्जा तात्काळ जाहीर करावा., २) गडावरील पायऱ्यांच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामास (ज्याचे इस्टिमेट जि.प. अलिबाग कडे प्रलंबित आहे) तात्काळ प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी द्यावी., ३) गडावर संत गुरू रविदास महाराज यांचे भव्य स्मारक व चांभार समाजाच्या शहिदांचे स्मारक / शौर्य स्तंभ उभारण्यात यावा., ४) महाड बस स्थानकाजवळील रतनजी चांभार गडकरी यांच्या समाधीचे जतन, संवर्धन व पक्के बांधकाम करावे., ५) महाड बस स्थानकासमोर चांभारगड मार्ग असा मोठा दिशादर्शक फलक लावावा., ६) मौजे चांभारखिंड गावात व गडाच्या पायथ्याला ऐतिहासिक चांभारगड असा मोठा स्वागत फलक लावावा., ७) जयंती दिवशी ग्रामपंचायत मौजे चांभारखिंड यांनी हजर राहून भाविकांना मार्गदर्शन व गडाचे ऐतिहासिक महत्त्व सांगावे., ८) महाड येथील चर्मकार समाजाचे संत गुरू रविदास तरुण मंडळ, संत गुरू रविदास महिला मंडळ, संत गुरू रविदास चांभारगड संवर्धन समिती तसेच चर्मकार समाजाचे व या गडासाठी सातत्याने प्रयत्न करणारे स्थानिक कार्यकर्ते यांना या नियोजन समितीमध्ये समाविष्ट करून गडाचा सर्वांगीण विकास करण्यात यावा. या उपरोक्त मागण्यांसाठी संबंधितांकडून तात्काळ अहवाल मागवून कार्यवाही करावी. अन्यथा आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास दि.१ जानेवारी २०२७ पासून आझाद मैदान, मुंबई येथे लोकशाही मार्गाने बेमुदत उपोषण आंदोलन करण्यात येईल, याची नोंद घ्यावी असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदन माहितीस्तव : २) भरतशेठ गोगावले, पालकमंत्री, रायगड जिल्हा, ३) शंभूराजे देसाई, पर्यटन मंत्री, ४) सौ.पंकजाताई मुंडे, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री, ५) आमदार अबू असीम आझमी, ६) जिल्हाधिकारी, रायगड, ७) पोलीस अधीक्षक, रायगड, ८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अलिबाग यांना देण्यात आलेल्या आहेत.

# महिला महाविद्यालयात शिक्षकदिनसोहळा उत्साहात संपन्न

### शिक्षक हा नित्य आदरणीय व वंदनीय आहे श्री संजयजी देशमुख यांचे प्रतिपादन

### *गुरुशिष्य परंपरा ही ज्ञानाचा कणा आहे - प्रा प्रसाद देशमुख यांचे प्रतिपादन

**परळी (प्रतिनिधी)**

भारतदेशाचे पूर्व उपराष्ट्रपति व राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस हा शिक्षक दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो . याचे औचित्य साधून येथील कै .लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतीक विभागाच्या वतीने महाविद्यालयात शिक्षकदिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला .

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष - संस्थेचे अध्यक्ष मा संजयजी देशमुख हे लाभले तर संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसादजी देशमुख हे प्रमुख वक्ते लाभले . याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ . विद्या देशपांडे व रासेयो वरिष्ठ विभाग प्रमुख - डॉ विवेकानंद कवडे व रासेयो कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा प्रवीण फुटके यांची उपस्थिती होती .

सर्वप्रथम विद्यादेवता सरस्वती व सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमांचे पूजन करून या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला.या कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा प्रवीण नव्हाडे यांनी केले त्यांनी आपल्या वक्तव्यात आपल्या जीवनात आलेल्या सर्वच शिक्षकांच्या विषयी कृतज्ञता ठेवण्यासाठीचा हा दिवस आहे . गुरुजींची जागा कोणीच घेऊ शकत नाही असे विचार मांडले . यानंतर कु सोनिया उजगरे, मीनाक्षी नानेकर , अमृता राडकर , सुजाता शेळके , गायत्री प्रयाग , योगेश्वरी ,मेहर पठाण या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले . प्रमुख वक्ते प्रा प्रसाद देशमुख सर यांनी आपल्या मनोगतात - सर्वपल्ली राधाकृष्णन हे तत्वज्ञानाचे शिक्षक होते . विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारा शिक्षकच आहे .तो देशाचे भविष्य घडवत



असतो . गुरुशिष्य परंपरा ही ज्ञानाचा कणा आहे असे विचार मांडले . प्राचार्या डॉ विद्याताई देशपांडे यांनी आपल्या भाषणात शिक्षक हे केवळ पुस्तकी ज्ञान देत नसून विवेक व आधार देणारा हा शिक्षकच रहाणार आहे असे चिंतन प्रतिपादन केले .

आपल्या अध्यक्षीय समारोपात संस्थेचे अध्यक्ष संजयजी देशमुख यांनी ज्या देशांमध्ये हा उत्सव एक दिवसाचा नसून नित्य शिक्षकांना अभिवादन करून त्यांचा आदर करा . जिथे शिक्षकाचा मान राखला जातो तोच देश सर्वांगीण विकास करू शकतो असे विचार प्रतिपादन करून शिक्षकदिनाच्या सर्वांना भरभरून शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु . शिल्पा साबळे हिने केले तर कु राजश्री इर्ले हिने आभार मानले . या कार्यक्रमासाठी संस्थेच्या संचालिका डॉ ध्येया देशमुख , डॉ यल्लावाड , डॉ विलास देशपांडे डॉ विनोद जगतकर , डॉ प्रवीण दिग्रसकर डॉ गोविंद कुलकर्णी प्रा फड प्रा श्रीकृष्ण राठोड प्रा हंकारे प्रा मिलिंद सोनकांबळे प्रा विशाल पौळ प्रा शरद रोडे प्रा आसेगाकर डॉ वर्षा मुंडे , प्रा विद्या गुळभिले डॉ संगिता कचरे डॉ रंजना शहाणे .डॉ राजश्री कल्याणकर , प्रा क्रांती पौळ ,डॉ भांगे मॅ ,प्रा आशिलता शिंदे प्रा आचार्य मॅ . महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनींची ही विशेष उपस्थिती होती .

# हिमालयातील विकासकामांचा अतिरेक मानवासाठी काळ

हिमालयातील विकासकामांचा अतिरेक मानवासाठी काळ बनत असून;निसर्ग कोपतो आहे व संपुर्ण जीवसृष्टी धोक्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. दिनांक २६ ऑगस्ट २०२६ चे नेपाळमधील महातांडव नेपाळला अंधःकारात नेणारे ठरले."ना भुतो ना भविष्यती" अशा प्रकारचा विनाशकारी महाप्रलय जगाने पहाला. यात हजारोंच्या संख्येने जीवीत हाणी झाली असूनही ६ हजारपेक्षा जास्त नागरिक आजही बेपत्ता आहेत व लाखोंच्या संख्येने तेथील लोक बेघर झाले आहेत ही अत्यंत दुःखद आणि अंगावर शहारे येणारी घटना संपूर्ण जगाने आपल्या उघड्या डोळ्यांनी पहाली.तरीही जगातील अनेक देश विकासाच्या नावाखाली हिमालयावर किंवा निसर्गावर वेगवेगळ्या पध्दतीने घणाघाती प्रहार करीत आहेत आणि त्याचेच प्रायश्चित्त आज नेपाळ सारख्या देशाला भोगावे लागत आहेत. हिमालय परिसरातील दिवसेंदिवस महाप्रलयाची चिंता वाढत आहे कारण पाऊस,भूस्खलन, ग्लेशियर वितळणे किंवा भूकंपासारख्या घटना या क्षेत्रात अचानक विनाशकारी महापुराचा धोका वाढु शकतो. हिमालयाच्या बाबतीत विचार केला तर यांच्या लगतच्या देशांना धोका निर्माण झाला आहे व पुढे चालुन याचे रूपांतर महाविनाशकारी होऊ शकते याचे जिवंत उदाहरण नेपाळच्या रूपात जगाने पाहिले.हिमालयाच्या लगतच्या देशांमध्ये भारत, नेपाळ,चीन(तिबेट परिसर), भूतान तर पूर्णपणे हिमालयीन प्रदेश आहे,पाकिस्तान आणि काही भौगोलिक नोंदीमध्ये अफगाणिस्तान किंवा म्यानमारचा काही सिमावर्ती भाग जोडला जातो. परंतु मुख्यत्वे करून हिमालया लगतचे पाच देश मानले जातात.त्यामुळे हिमालया लगतच्या विकासकामामुळे व जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीने या पाचही देशांसाठी महाविनाशाचा आलाराम नेपाळमधून २६ ऑगस्टला झाला आहे. त्यामुळे या पाचही देशांना हिमालयालगतचे विकास कामे ताबडतोब थांबविने किंवा नियंत्रित ठेवणे गरजेचे आहे व हिमनद्यांचे संरक्षण करण्यासाठी तातडीने कठोर पावले उचलण्याची आवश्यकता आहे. मुख्यत्वेकरून चीन हिमालया लगतच्या तिबेट परिसरात एकापाठोपाठ एक



**रमेश कृष्णराव लांजेवार,**
**( स्वतंत्र पत्रकार )**

नवीन-नवीन जलविद्युत प्रकल्प उभारत आहे.सोबतच रेल्वे,रस्ते वाहतूक उद्देशाने हिमालयालयामध्ये बोगदे तयार करीत असून खनण सुरू आहे.त्यामुळे आजच्या परिस्थितीत हिमालयाला सर्वात जास्त खिळखिळा करण्याचे काम चीन करीत आहे. त्यांचाच परिणाम आज वॉटर बॉम्बच्या रूपात व महाप्रलयाच्या रूपात नेपाळला भोगावा लागतो आहे.चीनने सध्याच्या परिस्थितीत आपल्या लगतच्या देशांच्या भोवताल मृत्यूची भिंत उभारल्याचे स्पष्ट दिसून येते.स्वतःचे वर्चस्व,स्वतःचा विकास व शेजारच्या राष्ट्रांवर आपली पकड रहावी या उद्देशाने चीन विनाशकारी कार्य निरंतर करीत आहे. जगात वाढती लोकसंख्या,वाढते औद्योगिकीकरण, युद्धजन्य परिस्थिती,जंगलतोड यामुळे हवामानात अवश्य बदल होत आहे आणि याचे प्रायश्चित्त संपूर्ण जग भोगत आहे यात दुमत नाही.परंतु चीन स्वतःच्या स्वार्थासाठी आपल्या शेजारच्या देशांना भयभीत करीत असून मृत्यूच्या खाईत लोटत आहे ही बाब नेपाळमधील नैसर्गिक विनाशकारी महाप्रलयावरून सिध्द होते.आज दोन आठवडे उलटुन गेल्यानंतरही हजारो नागरिक अद्यापही बेपत्ता आहेत तरीही शोध मोहीम सुरूच आहे.अशा कठीण घडीला जगातील संपूर्ण देशांनी व संयुक्त राष्ट्रसंघटनेनी सर्वोतोपरी सरळ हातांनी मदत करण्याची गरज आहे.बदलत्या हवामानामुळे जागतिक तापमानवाढ मर्यादा ओलांडल्याने संपूर्ण जगाला याचे गंभीर परिणाम भोगावे लागणार आहेत. नेपाळची भीषण नैसर्गिक आपत्ती ही निसर्गाची फक्त एक झलक आहे.परंतु यापुढे जगात भयानक महाप्रलय, सुनामी, भुकंप,हिमकडा कोसळणे, भूस्खलन,ज्वालामुखीचा उद्रेक अशा भयावह घटना ओढावण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे चीन सारख्या देशाने निसर्गावर अतीरेक करने थांबवावे.आज नेपाळ,भारत,पाकिस्तान,चीन (तिबेट परिसर), भूतान या देशातील हिमालयातील अनेक हिमकडे धोकादायक श्रेणीमध्ये आले आहेत.यामुळेच निसर्गाचे संतुलन दीवसें-दीवस डगमगतांना दिसत आहे.मानवतेच्या अतिरेकामुळे जागतिक तापमानात वाढ झाल्याने पृथ्वीवरील होणारे गंभीर दुष्परिणाम रोखण्याची संधी मानवाने पुर्णतः गमावली आहे.त्याचेच प्रायचित्य नेपाळसह जगातील अनेक देशांना वेगवेगळ्या रूपात भोगावे लागत आहे.तरीही धोकादायक स्थितीत असलेले तापमान सुरक्षित पातळीवर कसे आणता येईल याकडे हवामान शास्त्रज्ञांचे लक्ष लागले आहे.१९ व्या शतकाच्या मध्यातील तापमानाच्या तुलनेत १.५ अंश सेल्सिअस तापमानवाढीचे उद्दिष्ट शास्त्रज्ञांनी सर्वसाधारणपणे स्विकारले होते.परंतु आता २ अंश सेल्सिअस तापमान वाढीमुळे संपूर्ण जीवसृष्टी व पृथ्वी यांच्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात असे शास्त्रज्ञांच्या माध्यमातून सांगितले जात आहे.

# ना. पंकजाताई मुंडेंनी शिक्षकदिनी शिक्षकांविषयी व्यक्त केली शुभेच्छेतून कृतज्ञता !

## परळीच्या शालेय जीवनातील आठवणींना दिला उजाळा ; शुभेच्छाने शिक्षकही भारावले !

**परळी वैजनाथ |** एखादा व्यक्ती कितीही उच्च पदावर पोहोचला तरी तो आपलं गांव, आपली शाळा व तिथल्या गुरूजनांना विसरत नाही, शालेय जीवनातील आठवणींची शिदोरी त्याच्याकडे असतेच, त्याला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे तरी कशा अपवाद ठरतील? शिक्षक दिनाचे औचित्य साधून आज त्यांनी व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून आपल्या शाळेतील शिक्षकांविषयी कृतज्ञतेच्या भावना व्यक्त केल्या.

ना. पंकजाताई मुंडे यांचे दहावी पर्यंतचे शिक्षण शहरातील सरस्वती विद्यालयात झाले. त्यांना अध्यापन करणारे जवळपास सर्वच शिक्षक सेवानिवृत्त झाले आहेत. ज्यांच्या ज्ञानाचा आणि मार्गदर्शनाचा उपयोग करून आपण यशाचा पल्ला गाठला त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे आपले कर्तव्य आहे अशी प्रामाणिक भावना ठेवून त्यांनी आजच्या शिक्षकदिनी त्यांचा सत्कार केला. त्यांच्या सूचनेनुसार ना. पंकजाताईंचे वर्गमित्र प्रीतेश तोतला, सचिन गिते, पवन



मोदाणी, मोहन जोशी तसेच राहूल केंद्रे, स्वीय सहाय्यक अमित गिरडे यांनी ना. पंकजाताई मुंडे यांचे शिक्षक सर्वश्री नानासाहेब कवडे, शिवशंकर देशमाने, शंकरआप्पा मोगरकर, सुभाष नानेकर, वनमालाताई टाले, सरलाताई बजाज यांच्या घरी जाऊन ना. पंकजाताई



मुंडेंच्या वतीने त्यांचा सत्कार केला तसेच कृतज्ञतेचे पत्र दिले. आपली विद्यार्थीनी राज्याची मंत्री असून सुद्धा वेळात वेळ काढून आपली आठवण केली व आपला सत्कार केला हे पाहून शिक्षकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, रविवार, 6 सप्टेंबर 2026



## जय महेश कारखान्यामध्ये पोटॅशची निर्मिती

# परिसरातील शेतकऱ्यांना मिळणार लाभ

### यंदा दोन ते तीन हजार मेट्रिक टन उत्पादनाचे उद्दिष्ट-नारायण मूर्ती

**माजलगाव ( प्रतिनिधी )**

तालुक्यातील पवारवाडी येथील खासगी तत्त्वावरील जय महेश साखर कारखान्यामध्ये निर्माण होणाऱ्या उपपदार्थाचा उपयोग करून ड्रायर मधून पोटॅश निर्मितीचा उपक्रम सुरू केला आहे. मागील गळीत हंगामाच्या अखेरीस या उपक्रमातून सुमारे २०० टन पोटॅशची निर्मिती करण्यात आली होती. यंदाच्या हंगामात नवीन अत्याधुनिक बॉयलर बसऊन जास्त उत्पादन वाढवून तब्बल दोन ते तीन हजार मेट्रिक टन पोटॅश निर्मिती करण्याचे उद्दिष्ट कारखाना प्रशासनाने ठेवले असल्याची माहिती कारखाना उपाध्यक्ष नारायण मूर्ती यांनी दिली आहे.

निपाणी टाकळी येथे मागील वर्षी ड्रायर ची उत्पादन क्षमता वाढवण्यात आली होती. त्यातून उपलब्ध होणाऱ्या पदार्थावर प्रक्रिया करून पोटॅश तयार करण्यात येत आहे. या पोटॅशची परिसरातील शेतकऱ्यांना अल्प दरात विक्री करण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा होणार आहे. रासायनिक खतांच्या वाढत्या किमतीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवर उपलब्ध होणाऱ्या या खतामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चातही बचत होण्याची अपेक्षा आहे.

याबाबत पारसनाथ जयस्वाल, व्यवस्थापक, जय महेश कारखाना म्हणाले, मागील वर्षी प्रायोगिक तत्त्वावर २०० टन पोटॅशचे उत्पादन झाले. यंदा उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढवून दोन ते तीन हजार मेट्रिक टन करण्याचे नियोजन आहे. परिसरातील शेतकऱ्यांना अल्प दरात पोटॅश उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

याप्रसंगी उषा भगवान राठोड, सरपंच निपाणी टाकळी म्हणाल्या, कारखाना प्रशासनाने ग्रामपंचायतची रीतसर परवानगी घेऊनच हा प्रकल्प या ठिकाणी उभारला आहे. कारखान्यामुळे या भागाचा विकास होत आहे शेतकऱ्यांचे हीत जोपासत कारखान्याने अल्पदरात शेतकऱ्यांना पोटॅश देत आहेत व कारखाना शेतकऱ्यांसाठी आणखी विविध योजना राबवत आहे हे शेतकऱ्यांसाठी चांगलेच आहे असे त्या म्हणाल्या.

शेतकरी बंडू जिजाभाऊ ढिसले म्हणाले, शेतीसाठी आवश्यक खत स्थानिक पातळीवर आणि कमी दरात मिळत असेल तर शेतकऱ्यांसाठी ही समाधानाची बाब आहे. कारखाना प्रशासनाने हा उपक्रम सातत्याने सुरू ठेवावा या ड्रायर व बॉयलरच्या जवळच मी राहतो यापासून आम्हाला कसल्याही प्रकारचा त्रास नाही उलट यापासून शेतकऱ्यांचा फायदाच आहे.

शेतकरी नवनाथ पवार म्हणाले, मी देखील येथेच राहत असून यापासून आम्हाला कसल्याही प्रकारचा त्रास नाही तसेच पोटॅश अल्प दरात उपलब्ध झाल्यास ऊस उत्पादकांसह इतर पिकांच्या शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा होईल. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होईल.

दरम्यान, परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी जय महेश कारखान्यास मोठ्या प्रमाणात ऊस देऊन सहकार्य करावे, असे आवाहन कारखाना प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.



## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामुळे शैक्षणिक क्षेत्रातील वंचित विद्यार्थ्यांना न्याय : प्राचार्य डॉ जवाहरलाल भंडारी

देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)




गांधी महाविद्यालय कडा ता.आष्टी,जि.बीड येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्रातील मुलांसाठी उद्बोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉक्टर जवाहरलाल भंडारी हे उपस्थित होते त्यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये पुढील विचार व्यक्त केले,मुक्त विद्यापीठ ही संकल्पना नवी असून जगभरात सर्वत्र स्वीकार झाला आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ देशातील सर्व मान्यता प्राप्त विद्यापीठाशी समकक्ष आहे. त्यामुळे "ज्ञानगंगा घरोघरी" विद्यापीठाचे ब्रीदवाक्य असून लोकविद्यापीठ होण्याकडे वाटचाल करीत आहे. समाजाच्या तळागाळातील सर्वांपर्यंत गरजेनुसार शिक्षण पोहोचविणे विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे, मुख्यालय, विभागीय केंद्र, जिल्हा केंद्र, अभ्यासकेंद्र यांच्यामार्फत विद्यापीठाचे विविध शिक्षणक्रम ग्रामीण शहरी तसेच आदिवासी भागातील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. मातृभाषेतून शिक्षण उपलब्ध करून देण्याचे या विद्यापीठाचे धोरण असून लोकभाषेला ज्ञानभाषेचा दर्जा प्राप्त करून दिला पाहिजे, या यशवंतराव चव्हाण यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाला अनुसरून हे विद्यापीठ काम करीत आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्राचे केंद्रसंयोजक प्रोफेसर अशोक कोरडे यांनी प्रास्ताविकामध्ये असे सांगितले की यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ज्ञानगंगा घरोघरी या ब्रीदवाक्यानुसार आमचे अभ्यासकेंद्र कार्य करत आहे. त्यामध्ये समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाची गंगा जात आहे. वंचितांना शिक्षण मिळत आहे. विद्यार्थी केंद्रीय शिक्षणक्रम विकसित होत असून, मुक्त शिक्षण प्रणालीनुसार विद्यार्थ्यांच्या लवचिक अध्ययन व अध्यापन पद्धतीचा अवलंब करून शिक्षण वृद्धिंगत होत आहे. आमच्या अभ्यास केंद्रामध्ये एकूण 22 अभ्यासक्रम शिकविले जातात त्यामध्ये कला, सामाजिक शास्त्र, विज्ञान, वाणिज्य व व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश आहे. त्यामध्ये विविध जिल्ह्यातून विद्यार्थी प्रवेशित आहेत सन 2021-22 मध्ये अभ्यासकेंद्र सुरू झालेले आहे. आज रोजी 1000 विद्यार्थी प्रवेशित आहेत. त्यामध्ये सर्व स्तरातील प्रवेश वाढत आहेत असे त्यांनी सांगितले. तसेच उद्बोधन शिबिरातील समंत्रक वनस्पतीशास्त्र विषयाचे प्रोफेसर डॉ.शिवराज पाताळे यांनी विद्यार्थ्यांना सविस्तरपणे मार्गदर्शन करताना असे सांगितले की, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील अभ्यासक्रमाची ओळख करून देताना शैक्षणिक कार्यपद्धती, शिक्षणक्रमाची माहिती, समंत्रकांची ओळख, वेळापत्रक, पुस्तक वाटपाचे नियोजन, स्वाध्याय, प्रकल्प अहवाल, प्रकल्प आराखडा, क्षेत्रीय प्रकल्प, परीक्षेचे स्वरूप, विद्यार्थी कल्याण विषयक संधी, संपर्क सत्र, स्वयं अध्ययन साहित्य तसेच अभ्यास केंद्रातील विविध विषयांची माहितीद्वारे मार्गदर्शन केले जाते. या उद्बोधन शिबिर कार्यक्रमाचे आभार ज्येष्ठ प्रोफेसर डॉ.युनूस सय्यद यांनी मानले यावेळी, प्रोफेसर अशोक कोरडे पा, प्रोफेसर तुकाराम गोंदकर, प्रोफेसर राजकुमार थोरवे, प्रोफेसर उद्धव चव्हाण, प्रोफेसर नरेंद्र गवळी, प्रोफेसर किशोर कोईकर, प्रा नवनाथ विधाते, प्रोफेसर पांडुरंग अनारसे, प्रोफेसर आशिष कटारिया,प्रोफेसर सुपर्णा देशमुख, तंत्रसायक श्री ज्ञानेश्वर खंदारे, सहाय्यक श्री दीपक जगदाळे, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, आणि प्रवेशित विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते प्रोफेसर अशोक कोरडे पा, केंद्र संयोजक ,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त,विद्यापीठ अभ्यास केंद्र,गांधी कॉलेज कडा तालुका,आष्टी जिल्हा बीड.

## काळी (दौलतखान) येथील 30 खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचा प्रस्ताव 7 वर्षांपासून धूळ खात - ग्रामस्थांमध्ये संताप

### 35 ते 45 गावांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर, आरोग्यमंत्र्यांना स्मरणपत्र

महागाव | प्रतिनिधी

महागाव तालुक्यातील मौजे काळी (दौलतखान) येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याचा प्रस्ताव गेल्या ७ वर्षांपासून शासन दरबारी प्रलंबित आहे. २०१८ साली तत्कालीन सरपंच गौतमराव रणवीर यांनी ऑनलाईन टोकन क्र. Dist/ZPYV/2019/1654 व 1655 अन्वये केलेल्या मागणीनुसार जिल्हा शल्य चिकित्सक, यवतमाळ यांनी उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ यांच्या मार्फत हा प्रस्ताव संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना सादर केला होता.

उपसंचालकांचे पत्र क्र. जा.क्र. नियोजन/माहिती/93432/तारांकित/35813-15/18 दि. 28/09/2018 अनुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सकांचे पत्र दि. 04/07/2019 नुसार प्रस्ताव दिलेला आहे मात्र अद्याप रुग्णालय मंजूर झालेले नाही.

काळी दौलतखान परिसरातील ३५ ते ४५ गावांतील नागरिकांना आजही किरकोळ उपचारासाठी पुसद किंवा नांदेड येथे जावे लागते. यामुळे गरोदर माता, अपघातग्रस्त व सर्वसामान्य रुग्णांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते, अनेकदा जीव धोक्यात येत असून या प्रस्तावावर तात्काळ अंमलबजावणी व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संदेश गौतम रणवीर यांनी मा. आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य व संचालक, आरोग्य सेवा यांना स्मरणपत्र देऊन तात्काळ मंजुरीची मागणी केली आहे.

या मागणीची तात्काळ पूर्तता न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## गुरुवंदना अन् गोपाळकाल्याचा जल्लोष!

# संत तुकाराम विद्यालयात शिक्षक दिन व गोकुळाष्टमी उत्साहात

### ज्येष्ठ शिक्षक ज्ञानोबा माऊली गडदे यांचा विशेष सन्मान; विद्यार्थ्यांनी रंगवली दहीहंडी



परळी वैजनाथ | प्रतिनिधी

शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा शिक्षक दिन आणि भगवान श्रीकृष्णाच्या जन्माचा आनंदोत्सव असलेली गोकुळाष्टमी यांचा अनोखा संगम संत तुकाराम विद्यालय, नागापूर कॅम्प येथे पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांचा उत्साह, शिक्षकांप्रती असलेला आदर आणि दहीहंडीचा जल्लोष यामुळे संपूर्ण शाळेचा परिसर आनंदाने आणि उत्साहाने भारून गेला.

शिक्षक दिनानिमित्त शाळेच्या वतीने ज्येष्ठ शिक्षक श्री. ज्ञानोबा माऊली गडदे यांचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या 33 वर्ष प्रदीर्घ शैक्षणिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांना सन्मान प्रदान करण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगत आपल्या शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञतेच्या भावना व्यक्त केल्या.

दरम्यान, गोकुळाष्टमीनिमित्त आयोजित दहीहंडी उत्सवाने कार्यक्रमाची रंगत आणखी वाढवली. श्रीकृष्णाच्या जयघोषात विद्यार्थी आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. दहीहंडी फोडण्याच्या क्षणाने



विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह निर्माण झाला. पारंपरिक वेशभूषा, जयघोष आणि उत्साहपूर्ण वातावरणामुळे शाळेचा परिसर जणू गोकुळनगरीतच रूपांतरित झाला होता. या उत्सवातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा, एकता, सहकार्य आणि गुरुजनांप्रती आदर यांचे महत्त्व अनुभवता आले. शिक्षक दिनाचा सन्मानाचा सोहळा आणि गोकुळाष्टमीचा उत्साहपूर्ण जल्लोष असा दुहेरी आनंद देणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. एन.पी.मुंडे , उपमुख्याध्यापक श्री.अनिल पांचाळ, मधुकर राडकर,प्रा.संदीपान मुंडे,शिवाजी काजगुंडे, अनंत सलगर, दादासाहेब कोळेकर, मनोज एसके, चंद्रकांत स्वामी, श्रीमंत कांगणे, सतीश तुपसमुद्रे आदी शिक्षक उपस्थित होते.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)